*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

# UNIT 7

# KANT

## इमान्युएल काण्ट

7.1 : समीक्षात्मक तत्वज्ञान : प्रज्ञावाद आणि अनुभववादाला प्रतिसाद
7.2 : अनुभवपूर्व संश्लेषक ज्ञानाची शक्यता
7.3 : अवकाश - काल , अभिकल्प,नॉमिना-फिनॉमिना.



---

### प्रस्तावना

युरोपचे अठरावे शतक 'आव्हानाचे शतक'(Century of Challenges) म्हणून म्हणून गाजले. अनुभव वाद बुदधी वाद, संशय वाद भौतिक वाद अशी विविध वैचारिक रसायने एकत्र मिसळून वैज्ञानिक आणि तात्विक क्षेत्र खदखदत होते.हे सर्व वाद परस्परविरोधी विसंगत होते.त्यांना जोडून असलेले सामाजिक व राजकीय आंदोलन सुदधा अत्यंत उग्र झाले होते.विशेषत: अनुभववाद व बुदधीवाद यांनी परस्पर विरोधी टोकाची भूमिका घेतली. त्याचा परिणाम सगळया युरोपभर आणि सगळया जगाच्या इतिहासावर झाला. अशा गोधळाच्या काळात कान्टने एक वैचारिक शिस्त आणली म्हणून 18 वे शतक म्हणून *कान्टचे शतक* म्हणून ओळखले जाते.

कान्टचा जन्म 22 एप्रिल 1724 रोजी शनिवारी पहाटे पाच वाजता झाला.जर्मनीच्या कोनिग्जबर्ग या छोटयाशा शहरात कान्टचे संपूर्ण आयुष्य गेले. मृत्यूपर्यत तो कधीही तो शहराच्या बाहेर गेला नाही. त्याच्या पित्याचे नाव जोहान जॉर्ज कान्ट आणि आईचे नाव ॲन देगिना रॉयटर असे होते. कान्टला पाच भाऊ तीन बहीणी होत्या. हे घराणे अत्यंत भांडण सकणारे होते. कान्टच्या आईने कान्टला धर्माचे शिक्षण दिलेच पण ग्रहतारे निसर्ग अशा वैज्ञानिक ज्ञानाची भरही घातली.

कांटने संपूर्ण पाश्चात्य तत्वज्ञानाची समिक्षा केली व पूर्नरचना केली. बुध्दीवाद व अनुभववाद याने निर्माण केलेला गोधळ त्याने निस्तारला आणि त्यांच्यात समन्वय केला. नव्या तत्वज्ञानाची निर्मिती केली. परिपूर्ण ज्ञानशास्त्र आणि नितीशास्त्र निर्माण करणे सर्वश्रेष्ठ तत्वज्ञ आहे.'ज्याला कांट समजत नाही असा कोणताही माणूस बाल्यावस्थेत असतो', असे समजले पाहिजे, असे मत शॉपेन टॉर्बट या तत्वज्ञाने व्यक्त केले.

*Immanuel Kant*
*(22 April 1724 – 12 February 1804)*
*a German philosopher*
*from Königsberg*
*(today Kaliningrad of Russia),*
*researching, lecturing and riting*
*on philosophy and anthropology*
*at the end of*
*the 18th Century Enlightenment*



Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

कांटची महत्वाची ग्रंथसंपदा

Crietique of Pure Reason
Critique of Practical Reason
Critique of Judgement
Metaphysics of Morals
Metaphysical first Principles of Natural Science
On Perpetual Piece
Groundwork of the Metaphysics of Morals
Metaphysical Foundations of Natural Science



# कांटचा अतीतत्त्ववाद

## कांटपुढील समस्या :

कांटच्या काळात अनुभववाद व बुध्दीवाद अशा दोन मुख्य प्रणाली होत्या. त्या दोन्हीही प्रभावी होत्या. पण त्यामुळे ज्ञानाच्या, विज्ञानाच्या क्षेत्रात आणि दैनंदिन व्यवहारात प्रचंड गोंधळ माजलेला होता. कोणता वाद स्विकारावा, यासंबंधी कोणतेही निश्‍चित मत आणि भूमिका उपलब्ध नव्हते. हा गोधंळ निस्तारण्याची जबाबदारी कांटने स्विकारली या त्याच्या प्रयत्नातून तीन (critiques) या ग्रंथाचा जन्म झाला. अनुभववाद आणि बुध्दीवाद या दोघानी अतिरेकी टोक काढले हेते. त्या प्रत्येकात चांगले काही तरी होते पण म्हणूनच कोणाचे म्हणणे चांगले काही तरी होते. पण म्हणूनच कोणाचे स्वीकारावे यासंबंधी संभ्रम होता. कांटने तो मिटविला.

कांटच्या मते, माणसाच्या सर्व कृतीचे उददीष्ट शुभ आचार हाच असला पाहिजे. मानवी आचारण प्रामाणिक, शुध्द, निर्मळ, नि:स्वार्थी व पवित्र व्हावे म्हणून कांट ज्ञानाची संपूर्ण प्रकिया, पध्दती व उददीष्टये आणि मर्यादा तपासतो.त्याला कोणतेही नवे तत्वज्ञान घडवायचे नव्हते तर शुध्द बुध्दीच्या निंकषावंर तत्वज्ञानाची पुर्नरचना करावयाची होती.यासाठी तो अनुभववाद व बुध्दीवाद यांची समिक्षा, चिकीत्सा करतो. आणि आपली भूमिका स्पष्ट करतो.म्हणून कांटच्या तत्वज्ञानास *समीक्षा पध्दती* किंवा *समीक्षावाद* असे म्हटले आहे. तिचे स्वरुप पुढीलप्रमाणे :-

### समीक्षात्मक तत्त्वज्ञान : प्रज्ञावाद आणि अनुभववादाला प्रतिसाद

## कांटची समीक्षा पध्दती

सर्वसाधारपणपणे Criticism म्हणजे टिका करणे, दोष शोधणे पण त्याच्या विधायक अर्थ समीक्षा करणे असा होय] समीक्षा ही योग्य ते प्रश्‍न विचारुन दोष नष्ट करते आणि ज्ञानाची प्रकिया पुढे नेते. ज्ञानप्रकिया पूढे जाणे हे समीक्षेचे उददीष्ट असते. कांटच्या समीक्षा पध्दतीचे स्वरुप त्याच्या तत्वज्ञानाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनातून स्पष्ट होते.ती पुढीलप्रमाणे :-

कांटच्या तत्वज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन प्रामुख्याने ज्ञानशास्त्रीय आहे.नवअनुभववाद व बुध्दीवाद आणि हटट्‌ग्रहवाद यांची कांटने ज्ञानशास्त्रीय दृष्टिकोनातून केलेली चिकीत्सा म्हणजे त्याची समीक्षा पध्दती होय. ही त्याची पध्दती त्याचे सत्ताशास्त्र स्पष्ट करते. कांटचे सत्ताशास्त्र वरील तिनही वादांमधील विरोधांमध्ये समन्वय साधते.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*


कांटच्या मते, मानवी विवेक बुध्दी काही समस्यांचा विचार करते. या समस्या ती स्वत:सच निर्माण करते.त्यामूळे त्यांची उत्तरे देण्याची जबाबदारीसुध्दा तिचीचं असते. पण ती तितकी समर्थ नसते.त्यामूळे ती बुध्दी स्वत:च्या पलीकडे जाते. म्हणजेच बुध्दीला स्वत:च्या अतीत गेल्याशिवाय त्या प्रश्नांची उत्तरे देता येऊ शकत नाही. उदा. संकल्प स्वातंत्र्य, ईश्वर, अंतीम सदवस्तू, अमरता इ. या संकल्पनाची समीक्षा बुध्दीपलीकडे जाऊन करावी लागते. अशा समस्यांचा विचार करण्यासाठी अतित जाणे आवश्यक आहे,असे सांगणारा वाद म्हणजे ***अतीततत्त्ववाद*** होय.या अंतिम प्रश्नांचा विचार करणारे शास्त्र म्हणजे ***सत्ताशास्त्र.***

पण हे सत्ताशास्त्र निश्चित उत्तरे देतेच असे नाही. पण निदान या समस्यांचा विचार तरी करते. या समस्यांचा विचार धर्माच्या प्रवाहाखाली न करता विज्ञानाच्या मदतीने केला पाहिजे.त्यासाठी मानवी समाजाची, निसर्गाची, या विश्वाची रचना समजावून घेतली पाहिजे, आणि विज्ञानाच्या अभ्यासाची पध्दती म्हणजे *वैज्ञानिक पध्दती* होय. तिच्या साहाय्याने अनेक वैमानिक सत्ये ज्ञान होतात.पण बुध्दी काही अज्ञात सत्यांचे अनुमान करते पण तिथपर्यंत जाऊ शकत नाही. ही अतित अशी सत्ये असतात. अशा अंतिम सत्य किंवा ईश्वर या अज्ञात, अतित सत्यांविषयीच्या कांटच्या सिध्दांत म्हणजे *अतीतत्त्ववाद* होय.

## कांटचे सत्ताशास्त्र

कांटने ज्या विचारांचा समन्वय केला तो मुख्यत: सत्ताशास्त्रीय होता. अंतिम सत्तेचे ज्ञान हा सर्व तत्वज्ञांप्रमाणे कांटपुढेही होता. अंतिम सत्तेचे चिंतन व तिचे ज्ञान अशा सत्ताशास्त्रीय आणि ज्ञानशास्त्रीय या दोन्हीही तात्वीक अंगाचा विचार कांट करतो.या संबंधात अनुभववादी व बुध्दवादी विचारवंतानी मांडलेल्या भूमिका अत्यंत विरोधी व टोकाच्या ठरतात.त्यामुळे त्यांच्यात संघर्ष पेटलेला होताच, पण जनसामान्यांमध्ये सुध्दा तत्वज्ञानाविषयी गंभीर गैरसमज होता.कांटने हा गोधळ मिटविला. या दोन्ही भूमिकांची त्याने चिकीत्सा केली. त्यांच्यात समन्वय घडविला म्हणूनच कांटच्या तत्वज्ञानास ***समीक्षेचे तत्वज्ञान किंवा समन्वयांचे तत्वज्ञान*** म्हणतात. कांटला कोणतेही नवे तत्वज्ञान निर्माण करावयाचे नव्हते. तर असलेल्याचं तत्वज्ञानाची सुव्यवस्थित मांडणी करावयाची होती हे लक्षात ठेवले पाहिजे.

## सत्ताशास्त्राचे दोन प्रकार

कांटच्या मते सत्ताशास्त्र दोन प्रकारचे असते. मिथ्या आणि सत्य. मिथ्या म्हणजे भासमान सत्य नसणार पण सत्याचा आभास देणारे असे सत्ताशास्त्र व त्याला जोडलेले ज्ञानशास्त्र आपणास फसवते चकविते दिशाभूल करते. सत्य सत्ताशास्त्र खरे गंभीर माणसाला चिंतनास प्रवृत्त करणारे उपकारक असते. कांटने केलेला हा भेद अनुभववाद्यानी छिडकारला त्याने एक तर अनुभवापलीकडे जाणारे सत्ताशास्त्र नाकारले किंवा अनुभवांपुरतेच मर्यादीत केले बुध्दीवादयांनी कांटने केला तसा भेद न करता किंवा त्यानां तसा भेद करण्याची लक्षात न आल्याने ते फसव्या व ख-या सत्ताशास्त्राच्या व्यामुहात अडकले. कांटने अनुभववादी व बुध्दीवादी दोघांना बाहेर काढले.

कांटच्या मते सत्ताशास्त्र मिथ्या असो कि सत्य असो त्यातील विधांनाचे स्वरुप मात्र विशिष्ट प्रकारचे असते.या विधानांना तो विश्लेषक आणि अनुभवपूर्व म्हणतो. त्याच्या मते खरे तर ती संश्लेषक अनुभवपुर्व असली पाहिजे. म्हणजे काय ? तर हा विधान भेद पुढीलप्रमाणे :-

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



## संश्लेषक आणि विश्लेषक विधानांतील फरक

कोणतेही विधान विशिष्ट रचनेचे असते. त्यात उद्देश आणि विधेय अशी दोन पदे असतात.उददेश म्हणजे ज्ञेय वस्तू निर्देशित करणारे पद तर विधेय म्हणजे त्या उद्देशाविषयी दिलेली माहिती. या विधानांना अनुक्रमे *उद्देश विधान* आणि *विधेय विधान* असे म्हणतात. उदा. आंबा गोड आहे. यात आंबा हे उददेश आहे तर गोड हे विधेय आहे. राम दशरथचा मुलगा आहे यात राम हे उद्देश तर दशरथचा मुलगा हे विधेय आहे.

कोणत्याही विधानाचा हा उददेश आणि विधेय लक्षात घेतले विधानात उददेश व विधेय यांच्यात दोन प्रकारचा संबंध असल्याचे लक्षात येते, असे कांट निदर्शनास आणतो.

> एक तर उददेश हे विधेयांमध्ये समाविष्ठ असते किंवा ते विधेयाच्या बाहेर असते. जर विधेय उद्देशाविषयी माहिती देत नसेल तर त्या विधानास विश्लेषक (Analytic) असे म्हणतात.
> विधेय नवी माहिती देणारे उद्देशाबाहेरचे असेल तर त्या विधानास संश्लेषक (synthetic) म्हणतात.

थोडक्यात ज्या विधानातील उददेशात विधेयकाविषयीची नवी माहिती असते त्यास *संश्लेषक विधेय* म्हणावयाचे. ज्यात अशी माहिती नसते त्यास *विश्लेषक विधेय* म्हणावयाचे. उदा. साखर गोड असते व आंबा गोड असतो. यात साखर गोड असते हे विश्लेषक विधान आहे तर आंबा गोड आहे, हे संशलेषक विधान आहे

या दोन विधानांपैकी विशलेषक विधानाचे वैशिष्टये म्हणजे हे जरी कोणतेही नवे ज्ञान देत नसले तरी ते कधीही असत्य नसते.ते नेहमीच सत्य असते अशा विधानास *"सर्वत: सत्य विधान* (tautology) म्हणतात यात उद्देशाविषयी विधेयात नवी माहिती नसते. म्हणजे उददेश व विधेयक याचा अर्थ समान असतो. थोडक्यात विश्लेषक विधाने सर्वत: सत्य विधाने असतात.

याउलट संश्लेषक विधानात उददेशाविषयी काहीतरी नवी माहिती असते आणि त्यामुळेच त्याची सत्यता तपासून घ्यावी लागते. विधेय उददेशाबाहेरचे असते त्याची सत्यता तपासावी लागते म्हणूनच ते ज्ञान नेहमी सत्य नसणारे नसते. ते कधी असते तर कधी सत्य नसते. अर्थात ही सत्यता अनुभवावर आधारीत असते अशा विधानास कांट सर्वत: सत्य नसलेले (Contingent) असे म्हणतात. उदा. सोने हे पिवळे असते हे सर्वत: सत्य असलेले विश्लेषक विधान आहे. तर सोने हे महाग असते हे संश्लेषंक पण संशयास्पद विधान आहे. म्हणजे संश्लेषक विधानाची वैशिष्टये असे की त्याची सत्यता संशयास्पद असते.

या विधानांना संश्लेषक म्हणण्याचे कारण त्यात दोन भिन्न कल्पना एकत्र आणलेल्या असतात. आणि काही तरी नवीन सांगत असते. अशा विधानांमुळेच आपल्या ज्ञानात भर पडते नवे शोध लागतात विज्ञानाचा विकास होतो.अशा रीतीने कांट संश्लेषक विधान व विश्लेषक विधान यात फरक करतो.

या विधान भेदांप्रमाणेच कांट विधानांमध्ये आणखी एक भेद करतो तो म्हणजे अनुभवपूर्व विधान व अनुभवोत्तर विधान तो पुढीलप्रमाणे :-

## अनुभवपूर्व संश्लेषक ज्ञानाची शक्यता

### अनुभवपूर्पविधान व अनुभवोत्तर विधान (A Priori and a posteriori):-

A priori आणि a posteriori हे शब्द लॅटीन भाषेतील आहेत. त्यांच्या अर्थ अनुकमे *जे आधी होते त्यापासून* आणि *जे नंतर येते त्यापासून* असे आहेत. त्यासाठी आपण अनुभवपूर्व आणि अनुभवोत्तर असे साधे शब्द वापरु.पण त्याचा अर्थ काय ? आधी काय आणि कशाच्या ? तर कांटचे उत्तर असे की, ज्ञान आणि अनुभव.अनुभव

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---



म्हणजे इंद्रियानुभव. ज्या कशाच्या अनुभवानंतर आपणास ज्ञान होते ते अनुभवोत्तर ज्ञान होय. हे a posteriori ज्ञान आणि जे ज्ञान अनूभवाशिवाय किंवा अनुभवापूर्वीच आपणास मिळते त्यास A priori असे म्हणतात.

थोडक्यात अनुभवपूर्वी येते ते अनुभवपूर्व ज्ञान आणि जे ज्ञान अनुभवानंतरच येते ते अनुभवोत्तर ज्ञान.

आता कांटच्या मते विश्लेषक विधान हे अनुभवपूर्व असते आणि संश्लेषक विधान हे अनुभवोत्तर असते. विश्लेषक विधानाची सत्यता अनुभवावर आधारलेली नसते. अनुभव घेतला नाही तरी हे विधान सर्व काळात सत्यचं असते.म्हणून ते विधान सर्व काळात सत्य असते तर संश्लेषक विधानाची सत्यता अनुभवावरचं अवलंबून असते. अनुभवानंतरच ते सत्य की असत्य हे कळते. आता विधानाचे दोन नवे प्रकार कांट करतो.

अ. विश्लेषक अनुभवपूर्व विधान (Analitic a priori judgement)
ब. संश्लेषक अनुभवोत्तर विधान(Synthetic a priori judgement)

कांटच्या मते सत्ताशास्त्रीय विधाने ही बहतेक ही विश्लेषक अनुभवपूर्व विधानांनी बनलेले असते.असे सत्ताशास्त्र नकली, मिथ्या असते आणि खरे सत्य सत्ताशास्त्र हेसंश्लेषक विधानांनी बनलेले असते. उदा.मृत्युनंतर स्वर्गप्राप्ती होते किंवा आत्मा अमर आहे ही विधाने निश्लेषक स्वरुपाची विधाने राहतात पण त्यांचा अनुभव घेता येत नाही अंतिम सत्य अनुभवातील आहे. अनुभवापलीकडचे आहे. अशा विश्लेषक विधानांनी जे सत्ताशास्त्र बनते ते *मिथ्या सत्ताशास्त्र* होय. आता हया विधानांचा अनुभव येत नसला तरी ती विधाने सत्य म्हणून स्विकारावी.कारण ते ज्ञान इंद्रीयांना झाले नाही तरी बुध्दीला होते. असा दावा हे पारंपारिक सत्ताशास्त्र करते आणि इथेचं कांट आक्षेप घेतो.

कांटच्या मते ॲरिस्टॉटलपासून प्रचलीत असलेले पारंपारिक सत्ताशास्त्र अशाच विश्लेषक आणि अनुभवपूर्वतेचा दावा करणा-या विधानांनी बनलेले आहे. पण हे फसवे सत्ताशास्त्र आहे. ते अंतीम सत्येची कोणतीही नवी माहिती देत नाहीच पण सत्याचा दावा करतो. आणि कांटला अशा सत्ताशास्त्राची आणि त्यातील विधानांची चिकीत्सा करावयाची होती व त्यातून नव्या प्रकारच्या सत्य सत्ताशास्त्राची मांडणी करावयाची.

कांटला सत्ताशास्त्र विधाने नवी माहिती देणारी पण अनुभवावर आधारलेली नसलेली म्हणजे अनुभव पूर्व अशी विधाने हवी होती.कारण त्याच्या मते, आपले सर्व ज्ञान अनुभवापासून सुरु होते. पण ते अनुभवात संपन नाही ते त्या पलीकडे जाते.आणि बुध्दिगम्य सत्ये प्राप्त करुन देते.म्हणून सत्ताशास्त्र अशाच प्रकारच्या विधानांनी बनलेले असले पाहिजे. थोडक्यात, काण्टच्या मते ***अनुभवपूर्व संश्लेषक विधान कसे शक्य आहे ?***

कांटच्या मते सदवस्तू शास्त्रीयज्ञान हे सत्य असले पाहिजे. म्हणजेच ते नि:संशयरित्या आणि अनविार्यपणे सत्य आणि सार्वत्रिक असले पाहिजे. असे ज्ञान विज्ञानात प्राप्त होते. म्हणून सत्ताशास्त्राची रचना ही संश्लेषक अनुभवपूर्व विधानांनी बनलेली असली पाहिजे.एखादे विधान संश्लेषक असूनही ते सत्य असण्यासाठी अनुभवाची गरज नाही. हे कसे शक्य होते ? ही अशक्य वाटणारी गोष्ट कशी शक्य होते याचाच विचार कांट त्याच्या सत्ताशास्त्रात करतो.

गणित व निसर्गशास्त्रे ही संश्लेषक अनुभवपूर्व विधानांची बनतात. त्यांच्या सत्याविषयी आपण शंका उपस्थित करीत नाही. आणि त्याचा अनुभव घेण्याच्याही फंदात आपण पडत नाही. उदा. हे विश्व पृथ्वीभोवती फिरत नसून पृथ्वी चंद्रासह स्वत:भोवती फिरत सूर्याभोवती फिरते. या वैज्ञानिक विधानाची सत्यता आपल्या अनुभवापलीकडची आहे. आणि सत्य आहे. विज्ञान अशा विधानांनी बनते. तसे विधान म्हणजेच संश्लेषक अनुभवपूर्व विधान सदवस्तूशास्त्रात असले पाहिजे, असे कांट म्हणतो. आणि अशी विधाने कशी शक्य होतात हाही प्रश्न तो उपस्थित करतो.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

कांट पूर्वीच्या काळातील तत्वज्ञ आपली बुध्दी किंवा ज्ञानशक्ती सत्ताशास्त्रीय प्रश्न सोडवू शकते असे गृहित धरुन बेधडपणे तत्वज्ञान मांडत होते. या बुध्दीचे स्वरुप, त्याचे सामर्थ्य व तिच्या मर्यादा यांचा ते विचारच करत नाही. ते निर्धास्तपणे हटटाला अडून तत्वज्ञान मांडतात. अशा तत्वज्ञानाला कांट हटवादी तत्वज्ञान (Dogmatic) म्हणतो. या हटवादामुळेच ह्यूम सारख्या तत्वज्ञांच्या संशयवादी वर्ग निर्माण झाला. त्यांनी ही हटवादयांवर आक्षेप घेतले.

कांट या हटवादयांना आणि संशयवादयांना दोघांनाही उत्तर देतो.त्यासाठीच त्याने *शुध्दप्रज्ञेची चिकीत्सा* या नावाचे नवे समीक्षात्मक शास्त्र निर्माण करतो. [शुध्द प्रज्ञा म्हणजे अनुभवापासून स्वतंत्र असलेली प्रज्ञा] या प्रज्ञेत त्यांच्या मते 3 शक्ती असतात.

1]संवेदनशीलता (Sensibility)
2]आकलनशीलता (Understanding)
3]विवेकशीलता (Reason)

या तीन शक्तीनी प्रज्ञा सत्य ज्ञानाचा शोध घेते. आपल्या अनुभवाच्या पलीकडे जाते. त्याला ते अतीत असे म्हणतो. आणि प्रज्ञा जिचा शोध घेते ते सत्य म्हणजे ***अंतिम सदवस्तू (Thing it is self)*** होय.अशा सदवस्तूचे ज्ञान देणारे तत्वज्ञान अनुभवाच्या अंतिम जाते म्हणून कांटच्या तत्वज्ञानास अंतिम तत्ववाद असे म्हणतात. थोडक्यात कांटच्या मते आपले ज्ञान अनुभवापासून सुरु होते पण शेवट अंतीम सदवस्तूत होतो. हे ज्ञान करुन देते ती प्रज्ञा होय.

प्रज्ञा आपल्या तीन ज्ञानशक्तीच्या साहयाने ज्ञानाची सुरुवात या जगापासून करते. हे जग विविध वस्तूंनी, घटनांनी बनलेले आहे. या घटकांचे ज्ञान आपणास होते. या घटनांना किंवा जगाच्या ज्ञानाला कांट ***स्वरुप वस्तू (things in themselves)*** म्हणतो. या घटनांनांच तो ***फिनोमिना*** असे नाव देतो तर अंतिम सदवस्तू ला ***नॉमिना*** असे नाव देतो.

थोडक्यात **नॉमिना म्हणजे अंतिम सदवस्तू** आणि **फिनोमिना म्हणजे भौतिक घटकांचे जग** होय.

[अंतिम सदवस्तू हीच एकमेव सत्य ज्ञानाची वस्तू आहे. तेच एकमेव तत्व आहे. असे कांट सिध्द करतो. हा कांटचा एकतत्ववाद होय.]

## कांटची पदार्थाची कल्पना /कांटचे अभिकल्प

ऑरिस्टॉटल नंतरच्या काही तत्वज्ञानी सत्ताशास्त्रीय पदार्थाचे वर्गीकरण करण्याचार प्रयत्न केला. त्यांना ते ***पदार्थ/द्रव्य*** म्हणतात. कांट यांना **(Category)** किंवा अभिकल्प म्हणतो. हे अभिकल्प कांटच्या मते, शुध्द संकल्पना होय. या शुध्द संकल्पना संश्लेषणासाठी आवश्यक असतात.

हे पदार्थ/द्रव्य म्हणजे भौतिक विश्वातील वस्तू नव्हे. वैदीकांमधील न्यायदर्शन ज्यांना पदार्थ म्हणतो म्हणजे ज्ञानाच्या वस्तू म्हणजे तसे हे कांटचे अभिकल्प आहेत.पण कांटला अभिप्रेत असलेले हे पदार्थ ऑरिस्टॉटलच्या पदार्थापेक्षा वेगळे आहेत.अरिस्टॉटलच्या मतानुसारा पदार्थ म्हणजे ज्यांना नाव देता येते म्हणजे जी विधेय असतात ते पदे होय.कांटच्या मते हे पदार्थ म्हणजे कोणत्याही भौतिक वस्तूंच्या शुध्द संकल्पना.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

या संकल्पनांनी वस्तू तयार होते.त्यांचे ज्ञान ज्ञानेद्रिंयानी नाही तर प्रज्ञेनेच होते. या संकल्पनांच्या साह्याने आपणांस या भौतिक जगाचे म्हणजे फिनोमिनल जगाचे आकलन होते.म्हणून कांट त्यांना *आकलनाच्या रिती* म्हणतो. (Modes of understanding) उदा. घोडा, टेबल किंवा पेन या भौतिक वस्त आहेत. त्यांचे ज्ञान इंद्रियांनुभवानी होते. पण त्यांच्या संकल्पनांचे ज्ञान प्रज्ञेने होते. आणि ती संकल्पना अनुभवपूर्व असते.घोडयाची संकल्पना समजण्यासाठी प्रत्यक्ष घोडा पाहिलाचं पाहिजे, असे नसते. ती अनुभवपूर्व असते. हीच गोष्ट कार्यकारणभावाची आहे. कारणामुळे कार्य घडते किंवा कारण कार्याच्या आधी असते. याचा अनुभव घेण्याची गरज नसते. ते प्रज्ञेने कळते. करण कार्यकारणाची संकल्पना ही अनुभवपूर्व किंवा शुध्द संकल्पना असते.



कांटच्या मते अशा एकूण बारा संकल्पना किंवा अभिकल्पना आहेत. म्हणजे असे मुख्य चार अभिकल्प असून त्या प्रत्येकाचे उपमुख्य प्रकार आहे. त्यानुसार ते बारा होतात. ते पुढीलप्रमाणे :-

1] परिमाण Quantity :-
- 1) ऐक्य unity
- 2) अनेकत्व Plurality
- 3) समग्रत्व Totality

2) गुण Quality
- 4) सत्यता Reality
- 5) निषेधन Negation
- 6) मर्यादीत Limitation

3) संबंध Relation :-
- 7) समवाय Inherence
- 8) कारणता Causality
- 9) समुदाय Community

4) रिती Modality :-
- 10) शक्यता व अशक्यता
- 11) अस्तित्व व नास्तित्व
- 12) यादृच्छिकता व अनिवार्य

हे आपल्या आकलनाचे अभिक्लप आहेत.याचा अर्थ या जगाचे ज्ञान होताना, अनुभव येतांना आपणास वस्तूचे परिमाण कळते. त्याचे गुण कळतात. त्या वस्तूचा इतर वस्तूंशी असलेला संबंध कळतो आणि ती वस्तू अस्तित्वात आहे की नाही याची रिती कळते. या प्रकारेचं आपणांसस या फिनोमिनल जगाचे ज्ञान अनुभवाद्वारा होते. आणि जेव्हा आपली प्रज्ञा त्यापलीकडे जाते, अतित जाते तेव्हा ती अंतीम सदवस्तूचे ज्ञान या अभिकल्पांपलीकडे जाऊन प्राप्त करते.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

## दिक् (space) आणि काल (time)

कान्टच्या मते दिक् व काल ही इंद्रियानुभवाचा द्वारा अपणांस बाह्य वस्तू मिळविण्यासाठी अत्यावश्यक अटी आहेत. ती मानवाच्या संवदेनाच्या अंगभूत प्रवृत्तीतच अनुस्यूत असतात. दिक् व काल यांचे स्वरुप कसे आहे ? असा प्रश्न विचारल्यास त्याला अशी तीन शक्य उत्तरे संभवतात :

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

(1) दिक् व काल सत्य किंवा वास्तव वस्तू आहेत.

(2) ती केवळ आंतरिक निर्धारणे (Determinants) किंवा सत्य वस्तूंचे म्हणून स्वरुपवस्तूंचे संबंध असतात.

(3) ती अंतर्ज्ञानाच्या आकारांशी निगडीत असतात, आणि मानवी मनाच्या ज्ञातृत्वाच्या रचनेची अंगे असतात.

त्यापैकी पहिला दृष्टीकोन न्यूटनचा होता, दुस-यासारखा लायब्निझचा होता आणि कान्टचा दृष्टीकोन तिस-या प्रकारचा आहे.



कान्टच्या सद्वस्तुशास्त्रीय विवरणानुसार

(1) दिक् व काल ही अनुभवजन्य कल्पना नसून अनुभवपूर्व कल्पना असतात.
(2) ती संकल्पना नसून अंतर्ज्ञाने असतात.

हे दोन्ही मुददे एकत्र केल्यास दिक् व काल ही अनुभवपूर्व आणि शुध्द अंतर्ज्ञाने असतात असा त्याचा निष्कर्ष निघतो.दिक् व काल ही अनुभजन्य कल्पना नसून अनुभवपूर्व असतात.म्हणजे दिक् व काल यांचा कल्पना अनुभवापासून निष्पन्न किंवा निगमित होत नाहीत किंवा अनुभवापासून त्या उसन्या घेतल्या जात नाहीत, कारण अनुभवाची प्रक्रिया त्यांना गृहितच धरीत असते. उदा. इंद्रियवेदनाचा आपल्या शरीराबाहेरील वस्तूंशी जर संबंध जोडावयाचा असला तरी निदान वस्तू आपल्या बाहेर किंवा बाजूला आहेत आणि आत नाहीत, आणि त्या आधी असतात व नंतर येत नाहीत असे आपण गृहित धरल्याशिवाय इंद्रियसंवित्ती व प्रत्यक्ष वास्तव वस्तू यांची तुलना करण्याची कल्पनासुध्दा करता येणार नाही. वस्तू जवळ-दूर, आत-बाहेर-बाजूला, वर-खाली, मागे-पुढे म्हणजे कोठे तरी असण्याची जाणीव होणे, म्हणजे त्यांच्या दरम्यान दिक् किंवा अवकाश असणे हे गृहीत धरललेले असते, त्याशिवाय त्यांचे स्थान-निश्चयनच करता येणार नाही. तसेच घटना एकाच वेळी किंवा आधी - नंतर, पूर्वी-आता-नंतर म्हणजे केव्हातरी घडत असतात. तरच त्यांना अर्थ समजू शकतो ही आपणास होणारी जाणीव काल असणे हे गृहित धरीत असते. नाहीतर कालाची जाणीवच होऊ शकणार नाही. वेगळया शब्दात असे म्हणता येईल देशिक (Spatial) आणि कालिक (Temporal) संबंध भासांच्या अटी असतात, आणि दिक् व काल यांच्याशिवाय भासांची जाणीव होऊ शकणार नाही.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

## शुध्द अंतर्ज्ञाने (Pure intuitions)

कान्ट दिक् व काल यांना शुध्द अंतर्ज्ञाने (Pure intuitions) म्हणतो.आणि त्यांना अनुभवाच्या संदर्भात असाधारण स्थान असते, व ते म्हणजे दिक् व काल ही ज्ञानाच्या शक्यतेच्या अनिवार्य व सार्वदेशिक अटी (Conditions) असतात.

कान्टच्या मते दिक् व काल ही एकवाची (Singular) असतात आणि ती संकल्पना नसून अंतर्ज्ञाने असतात. कोणतीही संकल्पना ही तिच्यात विशिष्ट प्रकारच्या किंवा वर्गाच्या किंवा जातीच्या अनेक घटकांचे फक्त सामान्य गुणधर्म समाविष्ट असल्याने सामान्य कल्पना (General idea) असते, पण अंतर्ज्ञान (Intuition) मात्र फक्त एका विशिष्ट वस्तूची कल्पना असल्याने ते एकवाची ( Singular ) असते.यासाठी त्रिकोणाचे उदाहरण घेऊन म्हणतो की, 'त्रिकोणत्व' ही संकल्पना आहे, पण हा त्रिकोण हे अंतर्ज्ञान आहे. दिक् व काल एक आणि अनन्त असल्यामुळे ती संकल्पना नसून अंतर्ज्ञाने असतात.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

स्वरुपत: दिक् एक (one) असते व कालही एक (one) असतो. एक विशिष्ट दिक् दुस-या विशिष्ट दिक्हून भिन्न असते, आणि सर्व विशिष्ट दिक्ना अनेक भागांत कल्पनेने विभाजन करता येईल. परंतु त्या तिच्या सर्व विभागात गुणात्मक भेद असणार नाहीत. अनेक विशिष्ट दिक् एकाच दिकचे भाग असतात. म्हणून दिक् व काल फक्त एक आणि 'व्यष्टिरुप (Individual) असतात, आणि म्हणून त्यांचे ज्ञान संकल्पनेद्वारा न होता प्रामुख्याने अंतर्ज्ञानाच्याच द्वारा होऊ शकते. दिक् पूर्णपणे सजातीय (Homogeneous) असते आणि तिच्या विस्ताराला मर्यादा किंवा सीमा नसते. त्याचप्रमाणे कालही सजातीय, एक व असीम असतो. सर्व विशिष्ट काल गुणाच्या दृष्टीने पाहिल्यास एकसारखेच म्हणजे सजातीय असतात व सर्वत्र एकच अखंडित काल असतो.

म्हणून दिक् व काल या कल्पना अद्वितीय किंवा असाधारण (Unique) असतात. अनेक विविध, विशिष्ट व मर्यादित दिक्ना एकत्र आणून त्यांच्या बेरजेपासून एक व्यापक व सार्वदेशिक दिक् (Universal time) विभागी पध्दतीने तयार होत नसते. त्याचप्रमाणे अनेक विविध, विशिष्ट व मर्यादित कालांना एकत्र आणून त्यांच्या बेरजेपासून एक व्यापक व सार्वदेशिक काल (Universal time) विभागी पध्दतीने तयार होत नसतो. म्हणजे दिक् व काल यांची उत्पत्ती किंवा घडण विशिष्टांच्या अनुभवावर आधारुन करण्यात येत नसते. म्हणूनच त्यांचा उगम विचाराच्या किंवा आकलनाच्या स्वरुपातूनच होत असला पाहिजे असे कान्ट म्हणतो.

## अनुभवाचे साचे

दिक् व काल यांचे आकार आपले अनुभव घेण्याच्या क्रियेने गृहितच धरावयास पाहिजेत, कारण ते आपल्या इंद्रियवेदनाच्या क्रियेवर आपणांस नकळतपणे आणि अनिवार्यपणे लादून आपणांस जगाचे भान दिक्कालाच्या चौकटीतच करुन देत असतात. त्यापासून कोणाही मानवी व्यक्तीची सुटका होत नाही. दिक् व काल हे मानवाच्या संवदेनाचे मार्ग (Forms) किंवा साचे असतात व ते संकल्पनेचे प्रकार नसतात.

थोडक्यात, स्थल आणि काल स्वत:च अनुभवजन्य कल्पना नाहीत.त्या अनुभवपूर्व असतात.पण प्रत्यक्ष त्यांचे ज्ञान अनुभवगम्य नसते. तर त्यांचे ज्ञान प्रज्ञेने होते.ते अंर्तज्ञान असते.त्या एक (one) आणि अंनत (Infinite) अंर्तज्ञाने असतात.दिशा एक असते. काळ एकच असतो आणि अनंत असतो.आणि ह्या पलीकडे अंतिम सदवस्तू असते. तिचे ज्ञान बुध्दीला होत नाही. बुध्दी त्याचे अनुमान करते.

----------------------------------

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner